# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-2557266

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website: rdtenagpur.org.in**

क्र.तशिस/विकाना/शैवि-1/माहिती/2019/ 2627

दिनांक:- 27 AUG 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एच.एच.सी.टी/एमबीए,
एमसीए पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शै. वर्ष 2012-13 ते 2017-18 या कालावधीतील अनुसुचित जमाती या प्रवर्गात प्रवेशित विद्यार्थ्याची जात व जात वैधताप्रमाणपत्राच्या प्रती सादर करण्याबाबत.

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/2019/668, दि. 19/08/2019

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2012-13 ते 2017-18 या कालावधीतील अनुसुचित जमाती या प्रवर्गाच्या राखीव जागेवर प्रवेशित विद्यार्थ्यांची जात व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्याबाबत कळविलेले आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालय शैक्षणिक वर्ष 2012-13 ते 2017-18 या कालावधीतील अनुसुचित जमाती या प्रवर्गाच्या राखीव जागेवर प्रवेशित विद्यार्थ्यांची जात व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती या कार्यालयाकडे तात्काळ सादर कराव्या.

**(डॉ. चंद्रशेखर थोरात)**
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्र. २अ) यांना माहितीकरीता सविनय सादर.

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ

क्रमाक:२अ/एडीएम/२०१९/अज/६५८
दिनांक : 19 AUG 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय:- अनुसूचित जमातीचे नसतांना अनुसूचित जमाती म्हणून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या उमेदवारा विरुध्द कारवाई करणेबाबत.

संदर्भ: मा. पोलिस निरिक्षक,महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग,वरळी ,मुंबई यांचे पत्र क्र. मराअजाजआ/मुं/विधी/प्र.क्र.११२२०१९/२१०१, दि. २६.०६.२०१९

उपरोक्त संदर्भाधीन विषयाचे पत्र सहपत्रासह पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग , मुंबई यांच्या कार्यालयास अर्जदार श्री सदानंद गावीत यांनी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ते २०१७-१८ या कालावधी मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला राखीव कोटयातून प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमाती/जाती या प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांची नांवे , अर्जात नमूद केलेली जात व त्यांनी सादर केलेले जात पडताळणी प्रमाणपत्राच्या प्रतीची मागणी केलेली आहे. त्यामुळे आयोगाने आयोगाच्या अवलोकनार्थ सदर माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.

तरी आपल्या विभागातील सर्व संस्थांची माहिती संकलित करुन तात्काळ सदर माहिती मा. पोलिस निरिक्षक,महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग,वरळी ,मुंबई यांना सादर करुन त्याची प्रत या संचालनालयास सादर करण्यात यावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक 5462

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत:महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग, वरळी सी फेस, मुंबई १८ यांना माहितीसाठी.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग


प्रशासकीय इमारत, पहिला मजला, पूर्व विभाग, डेअरी विभाग,
अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.
दूरध्वनी क्र.(कार्यालय) २४९४३८१९
e-mail add:-scstcomm@yahoo.com


---

जा.क्र.मराअजाजआ/मुं/विधी/प्र.क्र.११२-२०१९/ 2101 दिनांक : २६/६/२०१९

प्रति,
मा. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१

विषय:- अनुसूचित जमातीचे नसतांना अनुसूचित जमाती म्हणून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या उमेदवाराविरुध्द कारवाई करणेबाबत.

सन २०१२.१३ ते २०१७.१८ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला अनु.जमाती (S.T) प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवार विद्यार्थ्यांची यादी ,त्यांनी सादर केलेला जातीचा दाखला तसेच जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रत याबाबत आपल्या कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन दिली जात नसल्याबाबत अर्जदार श्री.सदानंद गावीत यांनी आयोगाकडे तक्रार केली आहे.

अर्जदार यांच्या तक्रारीमध्ये तथ्य असल्यामुळे सन २०१२.१३ ते २०१७.१८ या शैक्षणिक वर्षांमध्ये अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी राखीव कोटयातून प्रवेश घेतलेल्या अनु.जमाती/जाती विद्यार्थ्यांची नांवे , अर्जात नमूद केलेली जात व त्यांनी सादर केलेले जात पडताळणी प्रमाणपत्राच्या प्रती आयोगाच्या अवलोकनार्थ त्वरेने पाठविण्यांत याव्यात.

मा.सदस्य (विधी) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.

पत्र प्राप्त झाले
2019

(स्वाक्षरी)
पोलीस निरीक्षक
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग,
मुंबई.

F:\v ratna\विधी-सकपाळ\विधी-अहवाल मागविणे--1.docx112